# सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १०७ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत
## गुरुवार, दि.१० ऑगस्ट, २०१७ दुपारी ०१:०० वा.

**व्यवस्थापन परिषदेची १०७ वी बैठक गुरुवार, दि.१० ऑगस्ट, २०१७ रोजी दुपारी ०१:०० वाजता** व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरुमहोदय यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

बैठकीस खालीलप्रमाणे उपस्थिती होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद |
|---|---|---|
| १) | प्रा. डॉ. मालदार एन. एन. - मा. कुलगुरु | अध्यक्ष |
| २) | डॉ. घनवट ए. ए. | सदस्य |
| ३) | डॉ. एस. एम. देशपांडे, विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर<br>मा. शिक्षण संचालक (उ.शि.) पुणे यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ४) | डॉ. डी. आर. नंदनवार, प्र.विभागीय सहसंचालक (उ.शि.) पुणे<br>मा. शिक्षण संचालक (तं.शि.) मुंबई यांचे प्रतिनिधी | सदस्य |
| ५) | प्रा. पी. प्रभाकर, प्रभारी कुलसचिव | सदस्य सचिव |
| ६) | डॉ. शेवाळे बी. सी., वित्त व लेखा अधिकारी | कायम निमंत्रित |
| ७) | श्री. पाटील बी. पी., संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | कायम निमंत्रित |

**स्वागत:**

मा. प्र. कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे स्वागत केले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस मा.अवर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई हे व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस अनुपस्थित होते.

सदर बैठकीत खालील प्रमाणे कामकाज झाले.

[ ०१ ] १८ जुलै, २०१७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव: १८ जुलै, २०१७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह वाचून कायम करण्यात आला.

१) पान क्र.७ वर, ठराव क्र.४ (३) मधील विषयात "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०३ मधील तरतूदीप्रमाणे" हे शब्द वगळण्यात यावेत. टिपणीतील पाचव्या ओळीतील "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०३ मधील तरतूदीप्रमाणे" हे शब्द वगळण्यात यावेत तसेच ठरावातील "महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६, कलम १०३ मधील तरतूदीप्रमाणे" हे शब्द वगळण्यात यावेत.

२) पान क्र. ९ वर, ठराव क्र. ४(५) मधील टिपणीतील सोळाव्या ओळीतील "रु.८,०००/- इतकी करण्यात आली आहे" हे शब्द वगळून त्याऐवजी "रु.१०,०००/- इतकी करण्यात आलेली आहे" या शब्दांचा समावेश करावा. तसेच ठरावातील अ.क्र. १ मधील "[रु.६,०००/- + १,५००/- (२५%) एकूण रु.७,५००/-] व" यानंतर "मा.उच्च न्यायालय, मुंबई येथील न्यायालयीन प्रकरणांसाठी मान्य करण्यात आलेल्या व्यावसायिक फीमध्ये २५% इतकी वाढ [रु.१०,०००/- + २,५००/- (२५%) एकूण रु.१२,५००/-] करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली." या शब्दांचा समावेश करण्यात यावा.

३) पान क्र. १० वर, विषय क्र.४ (६) मधील टिपणीतील एकोणीसाव्या ओळीतील "मा.कुलगुरुमहोदयांच्या आदेशान्वये" हे शब्द वगळण्यात यावेत.

४) पान क्र. ११ वर, विषय क्र.४ (७) मधील टिपणीतील चोवीसाव्या ओळीतील "मा.कुलगुरुमहोदयांच्या आदेशान्वये" हे शब्द वगळण्यात यावेत.

५) पान क्र. १२ वर, विषय क्र.४ (८) मधील टिपणीतील सतराव्या ओळीतील "मा.कुलगुरुमहोदयांच्या आदेशान्वये" हे शब्द वगळण्यात यावेत.

६) पान क्र. १३ वर, विषय क्र.४ (९) मधील टिपणीतील चोवीसाव्या ओळीतील "मा.कुलगुरुमहोदयांच्या आदेशान्वये" हे शब्द वगळण्यात यावेत.

७) पान क्र. १३ वर, विषय क्र.४ (९) मधील टिपणीतील बावीसाव्या ओळीतील "विद्यार्थ्यांच्या" या शब्दानंतर ", शिक्षकांच्या, शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या व पालकांच्या इ. यांच्या" या शब्दांचा समावेश करण्यात यावा.

**[ ०२ ] महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (१२) नुसार, मा. कुलगुरु यांनी नियतकालाने विद्यापीठाच्या कामाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर.**

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (१२) नुसार, मा. कुलगुरु यांनी नियतकालाने विद्यापीठाच्या कामाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर करणे आवश्यक आहे.

सबब, मा. कुलगुरु यांचा विद्यापीठाच्या कामाचा अहवाल व्यवस्थापन परिषदेसमोर सादर).

**ठराव: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम १२ (१२) नुसार, मा. कुलगुरु यांनी नियतकालाने विद्यापीठाच्या सादर केलेल्या कामाच्या अहवालाची नोंद घेण्यात आली.**

[ ०३ ] **संलग्नित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक या पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नव्याने नियुक्त झालेल्या व रुजू झालेल्या शिक्षकांचे, तसेच संस्था अंतर्गत बदलीने नियुक्त शिक्षकांचे चेंजिस इन स्टाफ मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावावर समितीने शिफारस केलेली आहे. सदर समितीचा कार्यवृत्तांत दंडक ६५ अन्वये मान्यतेची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी:- दि.१४/०७/२०१७ आणि १८/०७/२०१७ रोजी विद्यापीठामध्ये पार पडलेल्या चेंजिस इन स्टाफ समितीच्या बैठकीचा कार्यवृत्तांत सोबत जोडलेला आहे. संलग्नित ३० महाविद्यालयाकडून विविध विद्याशाखांतर्गत नवीन नियुक्ती व संस्था अंतर्गत बदली असलेल्या ११० शिक्षकांचे विहित मार्गाने चेंजिस इन स्टाफ मान्यता प्रस्ताव प्राप्त झालेले होते. सार्वजनिक विद्यापीठ कायदा, २०१६ दि. १ मार्च, २०१७ पासून सर्व विद्यापीठांना लागू झाला आहे. त्यानुसार विद्यापीठ Common Statutes अद्यापपर्यंत प्राप्त झाले नसल्याने सोलापूर विद्यापीठ, सोलापूर Ordinances framed under the Section of the Act, १९९४ मधील दंडक ०.९ (a) नुसार संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकांच्या चेंजिस इन स्टाफ प्रस्तावांच्या मान्यतेबाबतचे कार्यवाही करणे गरजेचे आहे. तरी चेंजिस इन स्टाफ प्रस्ताव छाननी व शिफारशी करिता महाराष्ट्र विद्यापीठ कायदा १९९४ कलम व शिवाजी विद्यापीठ कायदा १९७४ अंतर्गत केलेल्या दंडक क्रमांक ०.९ (a) प्रमाणे गठीत समितीच्या बैठका दि. १४/०७/२०१७ आणि १८/०७/२०१७ रोजी संपन्न झालेल्या आहेत. सदर समितीने प्रस्तावांची छाननी करुन शिफारशीसह बैठकीचा कार्यवृत्तांत सादर केलेला आहे.

उपरोक्त समितीच्या कार्यवृत्तांतास दंडक ६५ अन्वये व्यवस्थापन परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. यास्तव चेंजिस इन स्टाफ समितीचा कार्यवृत्तांत व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **संलग्नित महाविद्यालयातील सहायक प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व प्राध्यापक या पदावर सरळसेवेने व पदोन्नतीने नव्याने नियुक्त झालेल्या व रुजू झालेल्या शिक्षकांचे, तसेच संस्था अंतर्गत बदलीने नियुक्त शिक्षकांचे चेंजिस इन स्टाफ मान्यतेसाठी प्राप्त प्रस्तावावर समितीने केलेल्या शिफारशींच्या कार्यवृत्तांतास कार्यभाराच्या अधीन राहून दंडक ६५ अन्वये सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०४ ] **श्री. एम. एम. शेख, मानसेवी लेखनिक यांचा ११ महिनाचा कालावधी दि.३१/०७/२०१७ रोजी संपत असल्याने, त्यांना ०१ वर्षाचा मुदतवाढ व समान्य प्रशासन विभागाचे दिनांक १७/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक रु.२१,४००/- देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: श्री. एम. एम. शेख यांची विद्यापीठाचे पत्र क्र.सोविसो/आस्था/२०१६/८३६५, दि.३१/०८/२०१६ नुसार दि.०१/०९/२०१६ ते दि.३१/०७/२०१७ या कालावधीकरिता आस्थापना विभागाकडे नियुक्ती करण्यात आली आहे. सदरच्या कामाकरिता त्यांना समान्य प्रशासन विभागाचे दि.०८/०१/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक म्हणून दरमहा रु.१५,०००/- इतके मानधन देण्यात येत आहे.

श्री. एम. एम. शेख, मानसेवी लेखनिक यांची मुंदत दि.३१/०७/२०१७ रोजी संपणार आहे. यास्तव, श्री. एम. एम. शेख यांनी दि.१९/०७/२०१७ रोजी पत्रान्वये मुदतवाढ देण्यासंदर्भात व समान्य प्रशासन विभागाचे दि.१७/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक देण्याबाबत विनंती केली आहे.

श्री. एम. एम. शेख, मानसेवी लेखनिक यांच्याकडे खालील प्रमाणे कामे सोपाविण्यात आलेली आहेत.

- वेतन निश्चितीचे प्रकरणे तयार करण्यासाठी प्रशासकीय सेवकांस मार्गदर्शन करणे.
- सेवा निवृत्तीचे प्रकरणे तयार करण्यासाठी मार्गदर्शन करणे.
- सेवा पुस्तके अद्ययावत करण्यासाठी प्रशासकीय सेवकांस मार्गदर्शन करणे.
- आस्थापना विभागातील कर्मचाऱ्यांना इतर कामात मार्गदर्शन करणे.
- वित्त व लेखा विभागाकडील वेतन देयक व इतर कामात मार्गदर्शन करणे.

समान्य प्रशासन विभागाचे दिनांक १७/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक म्हणून रु.२१,४००/- (अक्षरी रुपये एकविस हजार चारशे फक्त) देय होतो.

सबब, सदर बाब धारेणात्मक असल्याने, श्री. एम. एम. शेख यांना ०१ वर्षाचा मुदतवाढ व समान्य प्रशासन विभागाचे दिनांक १७/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक रु.२१,४००/- (अक्षरी रुपये एकविस हजार चारशे फक्त )देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **श्री. एम. एम. शेख, मानसेवी लेखनिक यांचा ११ महिन्यांचा कालावधी दि.३१/०७/२०१७ रोजी संपत असल्याने, त्यांना ०१ वर्षाची मुदतवाढ देण्यास व सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १७/१२/२०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार मासिक परिश्रमिक रु.२१,४००/- देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०५ ] **मे. ए-वन सिक्युरिटी ॲन्ड लेबर कॉन्ट्रक्टर, ३४/९३, साईबाबा चौक, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर व मे. गोदावरी एन्टरप्रायजेस, मनुष्यबळ पुरवठादार, नांदेड यांना माहे जुलै, २०१७ पासून देयकामध्ये १८ टक्के जीएसटी. (GST) देण्याची बाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ.**

(टिपणी: मे. ए-वन सिक्युरिटी ॲन्ड लेबर कॉन्ट्रक्टर, ३४/९३, साईबाबा चौक, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर यांनी विद्यापीठास कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक पुरवठा करत आहेत. केंद्र शासनाने माहे जुलै, २०१७ पासून सर्व विभागास जीएसटी (GST) लागू केल्याने, माहे जुलै, २०१७ पासून देयकामध्ये नियमानुसार १८ टक्के जीएसटीसह (GST) देयक आदा करावे अशी विनंती केली आहे.

विद्यापीठाने सुरक्षेच्या कामासाठी मे. ए-वन सिक्युरिटी ॲन्ड लेबर कॉन्ट्रक्टर, ३४/९३, साईबाबा चौक, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर यांच्याकडून दि.०१/०३/२०१७ ते दि.२८/०२/२०१८ शया कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने सुरक्षा रक्षक घेण्यात येत आहे. तसेच मे. गोदावरी एन्टरप्रायजेस, मनुष्यबळ पुरवठादार, नांदेड यांच्याकडून दि.०१/०४/२०१७ ते दि.३१/०३/२०१८ या कालावधीकरिता कंत्राटी पध्दतीने कार्यालयीन कामासाठी मनुष्यबळ घेण्यात येत आहे.

केंद्र शासनाने दि.०१/०७/२०१७ पासून सर्व विभागास जीएसटी (GST) लागू केल्याने संबंधित पुरवठादारास माहे जुलै, २०१७ पासून १८ टक्के जीएसटीसह (GST) देयक आदा करणे आवश्यक आहे.

सबब, मे. ए-वन सिक्युरिटी ॲन्ड लेबर कॉन्ट्रक्टर, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर मे.गोदावरी एन्टरप्रायजेस, मनुष्यबळ पुरवठादार, नांदेड यांना माहे. जुलै, २०१७ पासून देयकामध्ये १८ टक्के जीएसटी (GST) देण्याबाबतची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

ठराव: **मे. ए-वन सिक्युरिटी ॲन्ड लेबर कॉन्ट्रक्टर, ३४/९३, साईबाबा चौक, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर व मे. गोदावरी एन्टरप्रायजेस, मनुष्यबळ पुरवठादार, नांदेड यांना माहे जुलै, २०१७ पासून देयकामध्ये १८ टक्के जी.एस.टी. (GST) देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[ ०६ ] **अंतर्गत तक्रार निवारण समितीवर b नुसार दोन शिक्षक व दोन प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी व d नुसार NGO मधून एक असे एकुण पाच सदस्य नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

टिपणी: महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक दि.१९ जून, २०१४ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ व दि.०९.१२.२०१३ च्या नियम अधिनियमातील तरतूदीनुसार ज्या आस्थापनेमध्ये १० किंवा १० पेक्षा अधिक अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश असेल अशा प्रत्येक नियोक्त्याने आपल्या आस्थापनामध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती गठित करावी.

यापूर्वी दि. ३० जुलै, २०१४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण समिती तीन वर्षाकरिता गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा कालावधी संपुष्टात आलेली आहे. त्यास्तव उपरोक्त शासन निर्णयानुसार नव्याने अंर्तगत तक्रार निवारण गठित करावी लागणार आहे. त्यास्तव सदर समितीवर व्यवस्थापन परिषदेच्या वतीने नामनिर्देशन करुन घेण्याची तरतूद आहे.

विद्यापीठ आनुदान आयोग नियमावली २०१५ Zero Tolerance for Sexual Harassment of Students & Women in Colleges & Universities या मार्गदर्शक पुस्तीका नुसार अंर्तगत तक्रार निवारण समिती गठित करण्याबाबत खालील प्रमाणे तरतूद केलेली आहे.

| | Description | Nominate for Chairperson, Member & Member Secretary |
|---|---|---|
| b | two faculty members and two non-teaching employees, preferably committed to the cause of women or who have had experience in social work or have legal knowledge, nominated by the Executive Authority; | |
| d | one member from amongst non-government organizations or associations committed to the cause of women or a person familiar with the issues relating to sexual harassment, nominated by the Executive Authority. | |

NOTE:

| | |
|---|---|
| 1 | Every Executive Authority shall constitute an Internal Complaints Committee (ICC) with an inbuilt mechanism for gender sensitization against sexual harassment. |
| 2 | At least one-half of the total members of the ICC shall be women. |
| 3 | Persons in senior administrative positions in the HEI, such as Vice-Chancellor, Pro Vice-Chancellors, Rectors, Registrar, Deans, Heads of Departments, etc., shall not be members of ICCs in order to ensure autonomy of their functioning. |

| | |
|---|---|
| 4 | The term of office of the members of the ICC shall be for a period of three years. HEIs may also employ a system whereby one –third of the members of the ICC may change every year. |
| 5 | The Member appointed form amongst the non-governmental organizations or associations shall be paid such fees or allowances for holding the proceedings of the Internal Committee, by the Executive Authority as may be prescribed. |
| 6 | Where the Presiding Officer or any member of the Internal Committee: |
| a | contravenes the provisions of section 16 of the Act; or |
| b | has been convicted for an offence or an inquiry into an offence under any law for the time being in force is pending against him; or |
| c | he has been found guilty in any disciplinary proceedings or a disciplinary proceeding is pending against him; or |
| d | has so abused his position as to render his continuance in office prejudicial to the public interest,such Presiding Officer or Member, as the case may be, shall be removed from the Committee and the vacancy so created or any casual vacancy shall be filled by fresh nomination in accordance with the provisions of this section.” |

सबब, अंर्तगत तक्रार निवारण समितीवर b नुसार दोन शिक्षक व दोन प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी व d नुसार NGO मधून एक असे एकुण पाच सदस्य नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **अंर्तगत तक्रार निवारण समितीवर b नुसार खालील दोन शिक्षक व दोन प्रशासकीय अधिकारी/कर्मचारी:**

**दोन शिक्षक :**

**१) डॉ. श्रीमती एम. जे. पाटील**

**२) डॉ. आर. एस. मेंते**

**दोन प्रशासकीय अधिकारी / कर्मचारी:**

**१) श्रीमती जे. के. कोकणे**

**२) श्रीमती ए. एस. आडगावकर**

**व d नुसार NGO मधून एक:**

**१) नुसरत खान पहाडे, कॅक्टस फाऊंडेशन, सोलापूर**

**अशा वरीलप्रमाणे एकूण पाच सदस्यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

**[ ०७ ] सोलापूर विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील बेस्ट ॲथलेटिक्स मुले व मुली प्रत्येकी अशी दोन चषके दर वर्षी देण्यासाठी रु.१,००,०००/- देणगी व फिरती जनरल ट्रॉफी दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त कै. श्री. पांडुरंग ईश्वरा मस्कर (माजी क्रीडा विभागप्रमुख शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर ॲथलेटिक्स कोच) यांच्या नावे देणगीची रक्कम व फिरते जनरल ट्रॉफी स्विकारण्यास मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: सोबतच्या पत्रानुसार श्री. अश्लेष पांडुरंग मस्कर यांनी सोलापूर विद्यापीठ, सोलापूर अंतर्गत होणाऱ्या ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी विद्यापीठाच्या नियमानुसार देणगीची रक्कम व फिरती जनरल ट्रॉफी त्यांचे वडील दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त कै. श्री. पांडुरंग ईश्वरा मस्कर (माजी क्रीडा विभागप्रमुख शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर ॲथलेटिक्स कोच) यांच्या नावाने देण्यासाठी रु.१,००,०००/- विद्यापीठात धनाकर्ष क्रमांक ५१५५२१ दि.१९/०७/२०१७ रोजी दिला असून सदर देणगीची रक्कम स्विकारण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा.कुलगुरुमहोदयांची मान्यता घेण्यात येवून सदरची रक्कम वित्त् व लेखा विभागात पावती क्र. ६१५७ दि.२६/०७/२०१७ नुसार देणगी जमा केली असून त्याची पावती विभागाकडे जमा आहे.

सबब, मा.कुलगुरुमहोदयांनी वरीलप्रमाणे केलेली कार्यवाही व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

ठराव: **सोलापूर विद्यापीठ आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धेतील बेस्ट ॲथलेटिक्स मुले व मुली प्रत्येकी अशी दोन चषके दर वर्षी देण्यासाठी रु.१,००,०००/- देणगी व फिरती जनरल ट्रॉफी दादोजी कोंडदेव पुरस्कार प्राप्त कै. श्री. पांडुरंग ईश्वरा मस्कर (माजी क्रीडा विभागप्रमुख शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर अंतर ॲथलेटिक्स कोच) यांच्या नावे देणगीची रक्कम व फिरते जनरल ट्रॉफी स्विकारण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

मा. कुलगुरु तथा अध्यक्ष महोदयांच्या परवानगीने येणारे आयत्या वेळेचे विषय:

[८(१)] **अंतर्गत तक्रार निवारण समिती वर अध्यक्ष नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: महाराष्ट्र शासन महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्र. मकचौ-२०१३/प्र.क्र.६३/मकक दि.१९ जून, २०१४ रोजी निर्गमित झालेल्या शासन निर्णयानुसार कामाच्या ठिकाणी महिलांचे लैंगिक छळापासून संरक्षण (प्रतिबंध, मनाई आणि निवारण) अधिनियम-२०१३ व दि.०९.१२.२०१३ च्या नियम अधिनियमातील तरतूदीनुसार ज्या आस्थापनेमध्ये १० किंवा १० पेक्षा अधिक अधिकारी / कर्मचारी यांचा समावेश असेल अशा प्रत्येक नियोक्त्याने आपल्या आस्थापनामध्ये अंतर्गत तक्रार निवारण समिती गठित करावी.

यापूर्वी दि. ३० जुलै, २०१४ रोजी अंतर्गत तक्रार निवारण समिती तीन वर्षाकरिता गठीत करण्यात आली होती. सदर समितीचा कालावधी संपुष्टात आलेली आहे. त्यास्तव उपरोक्त शासन निर्णयानुसार नव्याने अंर्तगत तक्रार निवारण गठित करावी लागणार आहे. त्यास्तव सदर समितीवर व्यवस्थापन परिषदेने अध्यक्ष नामनिर्देशन करुन घेण्याची तरतूद आहे.

| | **Description** | **Nominate for Chairperson, Member & Member Secretary** |
|---|---|---|
| **The ICC shall have the following composition:-** | | |
| a | A Presiding Officer who shall be a woman faculty member employed at a senior level (not below a Professor in case of a university, and not below an Associate Professor or Reader in case of a college) at the educational institution, **nominated by the Executive Authority**;<br>Provided that in case a senior level woman employee is not available, the Presiding Officer shall be nominated from other offices or administrative units of the workplace referred to in sub-section 2(o);<br>Provided further that in case the other offices or administrative units of the workplace do not have a senior level woman employee, the Presiding Officer shall be nominated from any other workplace of the same employer or other department or organization;” | |

Zero Tolerance for Sexual Harassment of Students & Women in Colleges & Universities या मार्गदर्शक पुस्तीका नुसार अंर्तगत तक्रार निवारण समितीवर अध्यक्ष नामनिर्देशन करण्याबाबत विद्यापीठ आनुदान आयोग नियमावली २०१५ मध्ये नमूद आहे.

सबब, अंतर्गत तक्रार निवारण समितीवर अध्यक्ष नामनिर्देशन करण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **अंतर्गत तक्रार निवारण समितीवर प्राचार्य डॉ. श्रीमती के. ए. पांडे, डी. ए. व्ही. वेलणकर कॉलेज ऑफ कॉमर्स, सोलापूर यांचे अध्यक्ष म्हणून सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

**[८(२)] व्यवस्थापन परिषद ठराव क्र. [१३ (३)] दि. १८ एप्रिल २०१७ रोजीच्या ठरावास अनुसरुन मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे दि.२८/०७/२०१७ रोजीचे श्री. रविंद्र महादेव कोरे यांना रेकॉर्ड-किपर-नि-लिपीक यापदावर रूजू करुन घेण्याबाबतचे पत्र विचारार्थ.**

**टिपणी** - श्री. कोरे रविंद्र यांनी रेकॉर्ड किपर-नि-लिपीक या पदाचा राजीनामा दिल्याने सदर पद रिक्त झालेले होते. यास अनुसरुन सदर पद भरतीसाठी जाहिरात प्रसिध्द करुन रितसर आवेदन पत्र मागविण्यात आले होते. तद्नंतर पात्र उमेदवारांची लेखी परीक्षा व इतर प्रक्रिया पूर्ण करण्यात येवून गुणवत्ता यादी प्रसिध्द करण्यात आली होती.

तथापि दरम्यानच्या काळात श्री. रविंद्र कोरे यांनी त्यांचा राजीनामा मागे घेण्यास व या पदावर रूजू करून घेण्याबाबतचे प्रकरण मा. उच्च न्यायालयात व शासन दरबारी प्रलंबित असल्याने, तसेच मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या दालनात श्री. रविंद्र कोरे यांच्या राजीनामा प्रकरणाबाबत सुनावणी घेण्यात आली होती. सुनावणीच्या अनुषंगाने त्यांच्याकडील निर्णय प्रलंबित असल्याने, यापदाची भरती करावी किंवा कसे याबबातचा विषय दि. १८/०४/२०१७ रोजीच्या व्यवस्थापन परिषदेसमोर सादर केला असता व्यवस्थापन परिषदेने खालील प्रमाणे ठराव पारीत केलेला आहे.

**"रेकॉर्ड कीपर-नि-लिपीक या पदाच्या नियुक्ती संदर्भात महाराष्ट्र शासनाकडून याबाबत आदेश आल्यानंतर यावर विचार करण्याचे सर्वानुमते ठरले." सदर ठरावानुसार सदर पदाची भरती प्रलंबित ठेवण्यात आलेली होती.**

तद्नंतर मा. विभागीय सहसंचालक (उ.शि.), सोलापूर विभाग यांनी पत्र क्र. शिससं/ उशि/ सोवि/ २०१७/ १४२९-३२ दि. १९/०७/२०१७ अन्वये मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांनी पत्राव्दारे दिलेल्या सूचनांनुसार श्री. रविंद्र कोरे यांच्या प्रकरणी महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील कलम क्र. ४६ (४) आणि वित्त विभागाचे शासन निर्णय १९९७ मधील तरतूदीनुसार श्री. रविंद्र कोरे यांनी रूजू करुन घेण्याबाबत त्वरीत कार्यवाही करुन कार्यवाही अहवाल त्यांच्या कार्यालयास, संचालनालयास व शासनास सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

तसेच सदर पत्रानुसार श्री. कोरे यांनी विद्यापीठात उपस्थित राहून रेकॉर्ड किपर नि लिपीक यापदावर रूजू होत असल्याचा आगमन अहवाल दि.२०/०७/२०१७ रोजी सादर केलेला आहे.

यास अनुसरुन मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण सोलापूर विभाग यांच्या श्री. कोरे रविंद्र यांना रेकॉर्ड-किपर-नि-लिपीक यापदावर सामावून घेण्याबाबत मा. कायदा अधिकारी यांचा अभिप्राय मागविण्यात आला होता.

मा. कायदा अधिकारी यांचा अभिप्राय अवलोकनी घेतला असता त्यांनी श्री. कोरे रविंद्र यांना रूजू करुन घेण्याबाबत शासनाने कळविल्यानुसार कार्यवाही करुन कार्यवाही अहवाल पाठविणे आवश्यक असल्याचे त्यांच्या अभिप्रायात नमूद केलेले आहे.

रूजू करुन घेणेबाबत योग्य ती कार्यवाही करताना सदरचे प्रकरण सद्य:स्थितीत न्यायप्रविष्ट असल्याने याची भविष्यात कायदेशिर दृष्टीने अडचणी निर्माण होण्याची शक्यता असल्याने व तसेच मा. विभागीय सहसंचालक, (उ.शि.), सोलापूर विभाग, सोलापूर यांचे दि. १९/०७/२०१७ चे पत्रानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्ती वेतन) नियम १९८२ मधील नियम क्र ४६ (४) हे नियम सदर कर्मचारी श्री. रविंद्र कोरे याचे प्रकरणास लागू होणार नाहीत असे वाटते. कारण श्री. रविंद्र कोरे यांची नेमणूक सन २००५ नंतरची आहे व त्यांना १९८२ चे निवृत्त वेतन नियम गैरलागू होत होतात.

तसेच वित्त विभागाचे शासन निर्णय १९९७ मधील तरतूदीनुसार श्री. रविंद्र महादेव कोरे यांना रूजू करुन घेण्याबाबत योग्य ती कार्यवाही करणेत मा. संचालक (उ.शि.), शिक्षण संचालनालय यांचे दि.१७/०७/२०१७ रोजीच्या पत्रातील मुददा क्र. (सी) नुसार अनुपालन होत नाही. राजीनामा अंमलात येण्याची तारीख दि.३०/०९/२०१४ आहे. आणि राजीनामा मागे घेण्यास परवानगी दिल्यास व श्री. कोरे यांना रूजू होण्यास मुभा दिल्यास अंदाजे ०२ वर्षे व १० महिने कालावधी होतो आणि दरम्यानच्या कामावरील अनुपस्थितीचा कालावधी नव्वद दिवसांपेक्षा अधिक होत असल्याने, याबाबत मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग यांच्याकडून मार्गदर्शन व स्पष्ट आदेश मागविण्यात आले होते.

यास अनुसरुन मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्याकडून श्री. कोरे रविंद्र यांना विद्यापीठ सेवेत रूजू करुन घेवून तसा अहवाल त्यांना मा. शिक्षण संचालक, (उ.शि.), पुणे, व शासनास सादर करण्याबाबत स्पष्ट आदेश प्राप्त झालेले आहेत.

सबब व्यवस्थापन परिषद ठराव क्र. [१३ (३)] दि. १८ एप्रिल २०१७ रोजीच्या ठरावास अनुसरुन मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांचे दि. २८/०७/२०१७ रोजीचे श्री. रविंद्र महादेव कोरे यांना रेकॉर्ड-किपर-नि-लिपीक यापदावर रूजू करुन घेण्याबाबतचे पत्र विचारार्थ).

ठराव: **मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, सोलापूर विभाग, सोलापूर यांच्या दि.२८/०७/२०१७ रोजीच्या पत्रात श्री. रविंद्र महादेव कोरे यांना रेकॉर्ड-किपर-नि-लिपीक या पदावर रूजू करुन घेण्याबाबतच्या निर्देशास अनुसरुन तथापि मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील याचिका क्र. LPA/49/2011 व RPWST/13304/2016 चे अधीन राहून श्री.रविंद्र महादेव कोरे यांना रेकॉर्ड-किपर-नि-लिपीक या पदावर रूजू करुन घेण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

## [८(३)] विद्यापीठाचा शै. वर्ष २०१५-१६ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक स्वरुपात) तयार केलेला १२ वा वार्षिक अहवाल विचारार्थ.

(टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १३६ (१) नुसार खालीलप्रमाणे तरतूद आहे.

सबब, सन २०१४-१५ चा वार्षिक अहवाल तयार करण्यासाठी गठीत वार्षिक अहवाल समिती खालीलप्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. ए. ए. शेख | अध्यक्ष |
| २. | डॉ. श्रीमती नभा काकडे | सदस्या |
| ३. | डॉ. डी. जी. कदम | सदस्य |
| ४. | डॉ.सुहास पुजारी | सदस्य |
| ५. | डॉ. आर. एस. मेंते | सदस्य |
| ६. | श्री. ए. बी. जाधव | सदस्य सचिव |

उक्त समितीने महाविद्यालये, विद्यापीठ संकुले व प्रशासकीय विभागाकडून मागवून घेतलेल्या माहितीवर एकत्रित विचार करुन वेळोवेळी अहवाल समितीच्या चार बैठका आयोजित करुन सदरचा मराठी व इंग्रजी भाषेतील अहवाल (पुस्तक स्वरुपात) तयार करुन व्यवस्थापन परिषदेकडे मान्यता देण्याबाबत कार्यवाहीसाठी शिफारस केलेली आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशी नंतर सदरच्या अहवालास अधिसभेची मान्यता घेणे आवश्यक आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १३६ (१) ची तरतूद खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| कलम १३६ | (१) अधिष्ठाता मंडळ, प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी विद्यापीठ, त्याच्या अधिकारितेतील महाविद्यालये व परिसंस्था यांचे प्रशासनिक, विद्याविषयक संशोधन व विकासविषयक व अन्य कार्यक्रम समाविष्ट असलेला वार्षिक अहवाल तयार करील व तो विचारार्थ व्यवस्थापन परिषदेला सादर करील. व्यवस्थापन परिषदेकडून मिळालेल्या वार्षिक अहवालावर अधिसभा चर्चा करील व तो मान्य करील. अधिसभेने मान्य केलेला असा अहवाल, कुलपती व राज्य शासन यांना शैक्षणिक वर्ष संपल्यानंतर एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल. |

सबब, सन २०१५-१६ चा उक्त समितीने तयार केलेला १२ वा वार्षिक अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ).

**ठराव: विद्यापीठाचा शै. वर्ष २०१५-१६ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक स्वरुपात) तयार केलेला १२ वा वार्षिक अहवाल स्विकारुन दुरुस्तीसह अधिसभेस मान्यतेची शिफारस करण्यात आली.**

**[८(४)] विद्यापीठाचा शै. वर्ष २०१५-१६ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक स्वरुपात) तयार केलेला १२ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सदस्याच्या नामनिर्देशनाबाबत.**

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम १३६ (१) मधील तरतूदीनुसार, विद्यापीठाचा शै. वर्ष २०१५-१६ चा १२ वा वार्षिक अहवाल अंक मराठी व इंग्रजी भाषेत तयार करण्यात आला असून, सदर अहवाल व्यवस्थापन परिषदेच्या दि.१० ऑगस्ट, २०१७ च्या बैठकीत सादर करण्यात आला आहे.

सदरचा सन २०१५-१६ चा १२ वा वार्षिक अहवाल आगामी होणाऱ्या अधिसभेच्या बैठकीत मान्यतेसाठी सादर करावा लागणार आहे.

सबब, शै. वर्ष २०१५-१६ चा १२ वा वार्षिक अहवाल अधिसभेच्या बैठकीत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने सदस्याच्या नामनिर्देशनाची बाब विचारार्थ).

ठराव: **विद्यापीठाचा शै. वर्ष २०१५-१६ चा मराठी व इंग्रजी भाषेतील (पुस्तक स्वरुपात) तयार केलेला १२ वा वार्षिक अहवाल अधिसभेत सादर करण्यासाठी व्यवस्थापन परिषदेच्या वतीने डॉ. बी. सी. शेवाळे, वित्त व लेखा अधिकारी यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.**

**[८(५)] व्यवस्थापन परिषदेच्या दि. १८/१०/२०१४ रोजीच्या ठरावानुसार मा. कुलगुरु यांनी दि. ११/११/२०१४ पासून अंतिम केलेली पॅनल ॲडव्होकेटची यादी संदर्भात केलेली कार्यवाही माहितीस्तव.**

(टिपणी: दि. १८/१०/२०१४ रोजीच्या ठराव क्र. ०४ नुसार जिल्हा व सत्र न्यायालय, विद्यापीठ व महाविद्यालय न्यायाधिकरण, पुणे उच्च न्यायालय, मुंबई येथील न्यायालयीन प्रकरण विद्यापीठाच्या वतीने चालविण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाच्या न्यायालयीन कामासाठी वकीलांची नावे मागवून वकीलांचे पॅनेल करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार ॲड श्री. बी. एस. सलगर यांनी वकिलांची नावे कळविलेली होती.

सदर पत्राच्या अनुषंगाने व मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि. १८/१०/२०१४ रोजीच्या ठरावानुसार मा. कुलगुरु यांनी अंतीम केलेली पॅनल ॲडव्होकेटची यादी खालील प्रमाणे...

अ) जिल्हा व सत्र न्यायालय येथील केसेस करीता वकिलांचे पॅनल:

१) ॲड श्री. एस. व्ही. उजळंबे

२) ॲड श्री. व्ही. वाय. पांढरे

३) ॲड श्री. एन. ए. ठोकडे

४) ॲड श्री. पी. बी. शेंडे

५) ॲड श्री. निशिकांत देगांवकर

ब) उच्च न्यायालय, मुंबई येथील केसेस करिता वकिलांचे पॅनल:

१) ॲड श्री. पी. एन. जोशी

२) ॲड श्री. एस. डी. ठोकडे

३) ॲड श्री. आय. एम. खैरदी

सबब मा. व्यवस्थापन परिषदेच्या दि.१८/१०/२०१४ रोजीच्या ठरावानुसार मा.कुलगुरु यांनी दि.२२/१२/२०१४ रोजी अंतीम केलेली पॅनल ॲडव्होकेटची यादी व मा.कुलगुरु यांनी दि. ११/११/२०१४ पासून अंतिम केलेली पॅनल ॲडव्होकेटची यादी संदर्भात केलेली कार्यवाही मा. व्यवस्थापन परिषदेच्या माहितीस्तव).

ठराव: **व्यवस्थापन परिषदेच्या दि.१८/१०/२०१४ रोजीच्या ठरावानुसार मा.कुलगुरु यांनी दि.२२/१२/२०१४ रोजी अंतिम केलेली पॅनल ॲडव्होकेटची यादी व मा.कुलगुरु यांनी दि. ११/११/२०१४ पासून अंतिम केलेली पॅनल ॲडव्होकेटची यादी संदर्भात केलेल्या कार्यवाहीची नोंद घेण्यात आली.**

**[८(६)] ॲङ श्री. रुपेशकुमार सी यांना विद्यापीठाचे पॅनेल ॲडव्होकेट, औरंगाबाद म्हणून नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: ॲङ श्री. रुपेशकुमार सी यांनी दि. २९/०७/२०१७ रोजी पाठविलेल्या ई-मेलच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या सादरीकरणावर मा. कुलगुरु यांच्या मान्यतेनुसार, सदर ई-मेल हे मा. प्र. कुलसचिव यांना पाठवून त्यात मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद येथील खंडपीठामध्ये ५ वर्षापासून वकिली व्यवसाय करीत असून महाराष्ट्रातील विविध प्राधिकरणाच्या वतिने न्यायालयीन कामकाज पाहत आहे. असे नमुद करुन त्यांना प्रस्तुत विद्यापीठाचे मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद येथील खंडपीठातील प्रकरणाकरीता पॅनेल ॲडव्होकेट, औरंगाबाद म्हणून नियुक्ती करावी अशी विनंती ॲङ श्री. रुपेशकुमार सी यांनी केलेली आहे. सोबत दि.२९/०७/२०१७ रोजीचे ई-मेल/पत्र जोडले आहे.

सद्यस्थितीत मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद येथे विद्यापीठाच्या वतिने कामकाज पाहण्यासाठी खालील नमूद वकिलांचे पॅनेल गठीत करण्यात आलेले आहे.

१) ॲङ श्री. सचिन देशमुख

२) ॲङ श्री. आनंद चावरे

सबब ॲङ श्री. रुपेशकुमार सी यांना मा. उच्च न्यायालय यांचे औरंगाबाद येथील खंडपीठा करिता विद्यापीठाचे पॅनल ॲडव्होकेट म्हणुन नियुक्ती करण्याची बाब विचारार्थ.)

ठराव: **ॲङ श्री. रुपेशकुमार सी यांना मा. उच्च न्यायालय यांचे औरंगाबाद येथील खंडपीठा करिता विद्यापीठाचे पॅनल ॲडव्होकेट म्हणून नियुक्ती करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**[८(७)] डॉ. मीना विठ्ठल माने, मानसेवी डॉक्टर यांचा ११ महिन्याचा कालावधी दि.१५/०८/२०१७ रोजी संपत असल्याने त्यांना मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: विद्यापीठ आदेश क्र.सोविसो/आस्था/२०१६/८७५५, दि.१६/०९/२०१६ रोजीच्या आदेशान्वये डॉ. मीना विठ्ठल माने यांची मानसेवी डॉक्टर म्हणून ११ महिन्यासाठी नियुक्ती करण्यात आली होती. सदर अकरा महिन्याचा कालावधी दि.१५/०८/२०१७ रोजी संपणार असल्याने त्यांनी पुर्ननियुक्ती मिळावी असा विनंती अर्ज केला असून सदर विनंती अर्जावर विद्यापीठ वैद्यकिय अधिकारी यांनी खालील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

डॉ. मीना माने यांनी गतनियुक्ती कालावधीमध्ये विद्यापीठातील विद्यार्थीनी व महिला कर्मचारी यांना चांगल्या प्रकारे वैद्यकिय सेवा दिलेली असून त्यांची सेवा यापुढेही आरोग्य केंद्रास लागणार आहे. सबब, डॉ. माने यांना महिला डॉक्टर म्हणून मानसेवी तत्वावर पुर्ननियुक्ती देण्यात यावी.

सबब, सदर बाब धोरणात्मक असल्याने डॉ. मीना विठ्ठल माने, मानसेवी डॉक्टर यांना मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **डॉ. मीना विठ्ठल माने, मानसेवी डॉक्टर यांचा ११ महिन्याचा कालावधी दि.१५/०८/२०१७ रोजी संपत असल्याने त्यांना ११ महिन्याची मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[८(८)] **शै.वर्ष २०१७-१८ पासून मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत नव्याने सुरु झालेल्या Bachelor of Journalism & Mass Communication Science (BJMC) व Bachelor of Library and Information Science (B.Lib.) हया अभ्यासक्रमासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेल्या शिफारसीनुसार परीक्षा शुल्क आकारण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी: मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत नव्याने सुरु झालेल्या BJMC व B.Lib. I.Sc. ह्या अभ्यासक्रमासाठी परीक्षा शुल्क निर्धारीत करणे आवश्यक होते. त्यास अनुसरुन सदरबाबत मा. प्र. अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा यांचा अभिप्राय मागविण्यात आलेला होता. डॉ. अशोककुमार ई. एन. (प्र.अधिष्ठाता-मानवविज्ञान विद्याशाखा) यांनी BJMC या अभ्यासक्रमास रु.६५०/- प्रति सत्र तर, B.Lib. I.Sc. या अभ्यासक्रमास रु.५५०/- प्रति सत्र इतके शुल्क (फी) आकारावे असा सोबत जोडल्याप्रमाणे अभिप्राय दिलेला आहे.

प्रचलित पध्दतीनुसार परीक्षा शुल्कास प्रथम परीक्षा व मूल्यमापन मंडळाची मान्यता घेवून सदरची बाब व्यवस्थापन परिषेदसमोर सादर केली जाते. व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेअंती सदरचे शुल्क आकराण्यात येते. तथापि, दरम्यानच्या काळात परीक्षा व मूल्यमापन मंडळाची बैठक आयोजित होणार नसल्याने मा. प्र. अधिष्ठाता यांनी उपरोक्तप्रमाणे शिफारस केलेल्य BJMC व B.Lib. I.Sc. या अभ्यासक्रमाच्या परीक्षा शुल्कास म.सा.वि. अधिनियम २०१६ कलम ४८ (२) अन्वये परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने मा.कुलगुरु महोदयांनी मान्यता देऊन व्यवस्थापन परिषदेस शिफारस केलेली आहे.

सबब, शै.वर्ष २०१७-१८ पासून मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत नव्याने सुरु झालेल्या Bachelor of Journalism & Mass Communication Science (BJMC) व Bachelor of Library and Information Science (B.Lib.I.Sc.) ह्या अभ्यासक्रमासाठी परीक्षा व मूल्यमापन मंडळाने केलेल्या शिफारसीनुसार परीक्षा शुल्क आकारण्याची बाब विचारार्थ).

ठराव: **शै.वर्ष २०१७-१८ पासून मानवविज्ञान विद्याशाखेतंर्गत नव्याने सुरु झालेल्या Bachelor of Journalism & Mass Communication Science (BJMC) या अभ्यासक्रमास रु.६५०/- प्रति सत्र व व Bachelor of Library and Information Science (B.Lib.) हया अभ्यासक्रमास रु.५५०/- प्रति सत्र इतके परीक्षा शुल्क आकारण्याबाबत मा.कुलगुरुमहोदयांनी परीक्षा व मूल्यमापन मंडळाच्या वतीने केलेली शिफारस स्विकारुन सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

[८(९)] **सोलापूर विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलांतर्गत असलेल्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्वशास्त्र (सध्याचे इतिहास आणि पुरातत्वशास्त्र) विभागातून एम.ए.पदवीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०१६-१७ पासून प्रत्येक वर्षी 'ॲड. कै. वासुदेव शहापूरकर आणि श्रीमती विमलाताई शहापूरकर सुवर्णपदक ' या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३१ (ट) नुसार रू १,००,०००/- (एक लाख रू) देणगी स्वीकारण्याची बाब विचारार्थ.**

(टिपणी :- डॉ. माया पाटील यांनी सोलापूर विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलातंर्गत असलेल्या प्राचीन भारतीय इतिहास , संस्कृती व पुरातत्वशास्त्र (सध्याचे इतिहास आणि पुरातत्वशास्त्र) विभागातून एम.ए. पदवीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०१६-१७ पासून प्रत्येक वर्षी 'ॲड. कै. वासुदेव शहापूरकर आणि श्रीमती विमलाताई शहापूरकर सुवर्णपदक ' या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता दि.०१/०८/२०१७ रोजीच्या पत्रासोबत रु.१,००,०००/- (एक लाख रू) इतकी देणगी विद्यापीठास धनादेशाव्दारे (सेन्ट्रल बॅक ऑफ इंडिया, कोंडी शाखा, सोलापूर धनादेश क्र.००३५५७९) दिली आहे. सदर रक्कमेच्या व्याजातून प्रतिवर्षी उपरोक्त नमूद नावाने सुवर्णपदक देण्यासाठीचा मानस विद्यापीठास कळविला आहे.

**सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३१ (ट) नुसार रु.१,००,०००/-(एक लाख रू) देणगी स्वीकारण्याची व सदर रक्कमेच्या व्याजातून उपरोक्त नमूद नावाने सुवर्णपदक देण्याची बाब विचारार्थ.**

ठराव: **सोलापूर विद्यापीठातील सामाजिकशास्त्रे संकुलांतर्गत असलेल्या प्राचीन भारतीय इतिहास, संस्कृती व पुरातत्वशास्त्र (सध्याचे इतिहास आणि पुरातत्वशास्त्र) विभागातून एम. ए. पदवीमध्ये प्रथम येणाऱ्या विद्यार्थी/विद्यार्थीनीस सन २०१६-१७ पासून प्रत्येक वर्षी 'ॲड. कै. वासुदेव शहापूरकर आणि श्रीमती विमलाताई शहापूरकर सुवर्णपदक ' या नावाने सुवर्णपदक देण्याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ मधील कलम ३१ (ट) नुसार रू १,००,०००/- (एक लाख रू) देणगी स्विकारण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

मा.कुलगुरु यांच्या परवानगीने बैठक संपल्याचे प्रभारी कुलसचिव यांनी जाहीर केले.

सही/-
सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

सही/-
अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद